**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, कोंकण खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ चे कलम १९ (३) अन्वये झालेले व्दितीय अपिल**

**अपिल क्रमांक : के.आर-१८७४/२०२४**

**अपिलार्थी, श्री.सिकंदर बी. मुल्ला,**
**३-A-३, अभिषेक कॉ.ऑ.हौ.सोसा.,**
**मनिषा नगर, कळवा, जि.ठाणे ४०० ६०५.**

विरुध्द

जन माहिती अधिकारी, अतिक्रमण विभाग,
ठाणे महानगरपालिका ठाणे, महापालिका भवन,
सरसेनानी अरुणकुमार वैद्य मार्ग, चंदनवाडी,
पाचपाखाडी, ठाणे जि.ठाणे ४०० ६०२.

प्रथम अपीलीय प्राधिकारी तथा अतिक्रमण विभाग,
ठाणे महानगरपालिका ठाणे, महापालिका भवन,
सरसेनानी अरुणकुमार वैद्य मार्ग, चंदनवाडी,
पाचपाखाडी, ठाणे जि.ठाणे ४०० ६०२.

**द्वितीय अपिल अर्ज सुनावणीचा दिनांक : २४.७.२०२५**

| माहितीचा अर्ज दाखल केल्याचा दिनांक | जन माहिती अधिकारी यांच्या उत्तराचा दिनांक | प्रथम अपिल अर्ज दाखल दिनांक | प्रथम अपिल आदेश दिनांक |
|---|---|---|---|
| १९.१.२०२४ | ---- | २२.३.२०२४ | ------ |

अपिलार्थी यांनी दि.२३.५.२०२४ रोजीच्या अर्जान्वये "माहिती प्राप्त झाली नाही." असे कारण नमूद करुन कलम १९(३) अन्वये व्दितीय अपिल अर्ज दाखल केला आहे. सदर द्वितीय अपिल अर्जात त्यांनी जन माहिती अधिकारी यांचेवर दंडात्मक कारवाई करण्यात यावी तसेच नुकसान भरपाई देण्यात यावी अशी विनंती केली आहे.

सदर द्वितीय अपिलावर आज दिनांक २४.७.२०२५ रोजी सुनावणी घेण्यात आली.

सदर सुनावणीस अपिलार्थी उपस्थित आहेत. तथापि, जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलिय अधिकारी अनुपस्थित आहेत.(कार्यालयाद्वारे नोटीस प्राप्त झालेबाबतचे ट्रॅकिंग रिपोर्ट सादर करण्यात आले असून, ते नस्तीसोबत अभिलेखावर ठेवण्यात आलेले आहेत).

अपिलार्थी यांनी मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांचेकडे खालीलप्रमाणे माहिती मागितली आहे.

*"(a) pl. provide details list of Unauthorized Constructions in the TMC Area with action taken by you including copy FIR water charged and demolition charges recover proof form the offender (s). (b) Provide evidence, if you have abided/implemented, under provisions of Section No. ४ (१) (b) Sub Sec. १ to १७ of RTI Act. (c) I/We would like to have certified copies extracted from the aforesaid records after inspecting the same, hence kindly grant permission in writing to inspect the same records including Registers of Visitor Book/s, Registers of Inward/Outward, Attendence, late, Movement & Station Dairy etc.)"*

तद्नंतर अपिलार्थी यांनी जोडपत्र ब मध्ये "माहिती प्राप्त झालेली नाही." असे कारण नमूद करुन प्रथम अपिलीय अधिकारी यांचेकडे कलम १९(१) अन्वये प्रथम अपिल दाखल केले.

जन माहिती अधिकारी अनुपस्थित असल्यामुळे द्वितीय अपिलावर, गुणवत्तेवर निर्णय देण्यात येत आहे.

या प्रकरणी अपिलार्थी यांनी असे निवेदन केले की, त्यांना अद्यापपर्यंत माहिती प्राप्त झालेली नाही. जन माहिती अधिकारी हे आजच्या सुनावणीची नोटीस प्राप्त होऊनसुध्दा अनुपस्थित आहेत. सबब, अपिलार्थी यांना माहिती मिळण्यास झालेल्या विलंबाबद्दल विलंबाच्या प्रत्येक दिवसासाठी तत्कालीन जन माहिती अधिकारी यांचेवर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ अंतर्गत २० (१) अन्वये प्रति दिवस रु.२५०/- (अधिकतम रु.२५,०००/-) इतक्या शास्तीची आकारणी का करण्यात येऊ नये याचा लेखी खुलासा तत्कालीन जन माहिती अधिकारी यांनी पुढील सुनावणीस आयागोकडे स्वत: उपस्थित राहून सादर करणे उचित होईल. त्याचप्रमाणे अपिलार्थी यांनी दाखल केलेल्या प्रथम अपिलावर सुनावणी घेतली नाही व कोणतेही आदेश पारित केले नसल्यामुळे त्यांचेविरूध्द सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय, मुंबई यांचे शासन परिपत्रक क्र.के.मा अर्ज-२००७/७४/प्र.क्र. १५४/०७/०६, दि.३१/०३/२००८ नुसार शिस्तभंगाविषयक कार्यवाही प्रस्तावित का करण्यात येऊ नये याचा लेखी खुलासा

तत्कालीन प्रथम अपिलिय अधिकारी यांनीही पुढील सुनावणीस आयोगाकडे स्वत: उपस्थित राहून सादर करणे उचित होईल. तसेच विद्यमान जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थी यांनी मागणी केलेली संपूर्ण माहिती पुढील १५ दिवसांत नोंदणीकृत टपालाने विनामूल्य पुरविणे उचित होईल. प्रस्तुत प्रकरणी पुनश्चः सुनावणी घेण्यात येईल. यास्तव आयोग पुढील आदेश देत आहे.

**आदेश**

१. विद्यमान जन माहिती अधिकारी तथा सहा. आयुक्त, अतिक्रमण विभाग, ठाणे महानगरपालिका,ठाणे यांनी **अपिलार्थी यांनी मागणी केलेली संपूर्ण माहिती पुढील १५ दिवसात नोंदणीकृत टपालाने नि:शुल्क पुरवावी.** जी माहिती उपलब्ध नाही त्याबाबत मुद्देनिहाय स्पष्ट व विविक्षित उत्तर अपिलकर्ता यांना १५ दिवसांत पाठवावे.

२. तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा सहा. आयुक्त, अतिक्रमण विभाग, ठाणे महानगरपालिका,ठाणे यांनी अपिलार्थी यांच्या दिनांक १९.१.२०२४ रोजीच्या माहिती अर्जाला अनुसरुन विहीत मुदतीत अथवा त्यानंतर देखील माहिती पुरविली नाही. म्हणून त्यांचेवर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ अंतर्गत २० (१) अन्वये प्रति दिवस रु. २५०/- (अधिकतम रु.२५,०००/-) इतक्या शास्तीची आकारणी का करण्यात येऊ नये, **याचा लेखी खुलासा त्यांनी आयोगाकडे दि.३०.९.२०२५ रोजी दुपारी १२.०० वाजता स्वत: उपस्थित राहून सादर करावा. अन्यथा, प्रस्तुत प्रकरणी त्यांचे काहीही म्हणणे नाही असे गृहीत धरुन शास्तीचे आदेश कायम केले जाऊ शकतील, याची नोंद घ्यावी.**

३. तत्कालीन प्रथम अपीलीय प्राधिकारी तथा उप आयुक्त, अतिक्रमण विभाग, ठाणे महानगरपालिका, ठाणे यांनी अपीलार्थी यांनी दिनांक २२.३.२०२४ अन्वये दाखल केलेल्या प्रथम अपीलावर सुनावणी घेऊन निर्णय निर्गमित केलेला दिसून येत नाही. त्यामुळे त्यांचेविरुध्द सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय, मुंबई यांचे शासन परिपत्रक क्र.के.मा अर्ज-२००७/ ७४/प्र.क्र.१५४/०७/०६, दि.३१/०३/२००८ नुसार शिस्तभंगाविषयक कार्यवाही प्रस्तावित का करण्यात येऊ नये, **याबाबतचा लेखी खुलासा त्यांनी आयोगाकडे दि.३०.९.२०२५ रोजी दुपारी १२.०० वाजता स्वत: उपस्थित राहून सादर करावा. सदर मुदतीत लेखी खुलासा प्राप्त न झाल्यास त्यांचे प्रस्तुत प्रकरणी काहीही म्हणणे नाही, असे गृहित धरुन शिस्तभंगाविषयक कार्यवाही प्रस्तावित करण्याबाबतचे आदेश कायम करण्यात येतील, याची नोंद घ्यावी.**

४. **प्रस्तुत प्रकरणी पुढील सुनावणी दि.३०.९.२०२५ रोजी दुपारी १२.०० वाजता घेण्यात येईल.**

राज्य माहिती आयोग
महाराष्ट्र

**(शेखर चन्द्रे)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**कोंकण खंडपीठ**

कोंकण भवन,
बेलापूर, नवी मुंबई : ४०० ६१४.
दिनांक : २४ जुलै, २०२५

**प्रत आवश्यक कार्यवाहीस्तव रवाना,**
तत्कालीन प्रथम अपीलीय प्राधिकारी तथा उप आयुक्त, अतिक्रमण विभाग,
ठाणे महानगरपालिका ठाणे, महापालिका भवन,
सरसेनानी अरुणकुमार वैद्य मार्ग, चंदनवाडी, पाचपाखाडी, ठाणे जि.ठाणे ४०० ६०२.
**-यांना प्रत** विद्यमान प्रथम अपीलीय प्राधिकारी तथा उप आयुक्त, अतिक्रमण विभाग,
ठाणे महानगरपालिका ठाणे, महापालिका भवन,
सरसेनानी अरुणकुमार वैद्य मार्ग, चंदनवाडी, पाचपाखाडी, ठाणे जि.ठाणे ४०० ६०२ **यांचेमार्फत रवाना.**

तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा सहा. आयुक्त, अतिक्रमण विभाग,
ठाणे महानगरपालिका ठाणे, महापालिका भवन,
सरसेनानी अरुणकुमार वैद्य मार्ग, चंदनवाडी, पाचपाखाडी, ठाणे जि.ठाणे ४०० ६०२.
**-यांना प्रत** विद्यमान जन माहिती अधिकारी तथा सहा. आयुक्त, अतिक्रमण विभाग,
ठाणे महानगरपालिका ठाणे, महापालिका भवन,
सरसेनानी अरुणकुमार वैद्य मार्ग, चंदनवाडी, पाचपाखाडी, ठाणे जि.ठाणे ४०० ६०२ **यांचेमार्फत रवाना.**